# मुंबई विद्यापीठ

**परिपत्रक** :— क्र. टीएएएस(युटी/सीटी)/ ०४ /२०१७—२०१८

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकीय आणि अशासकीय, अनुदानीत/विनाअनुदानित अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, व्यवस्थापन, स्थापत्यशास्त्र आणि हॉटेल मॅनेजमेंन्ट महाविद्यालयांचे प्राचार्य व महाविद्यालयातर्फे संबंधित संस्थाचे अध्यक्ष/ सचिव तसेच संचालक — जमनालाल बजाज इन्स्टिटयूट मॅनेजमेंन्ट स्टडीज, संचालक — अल्केश दिनेश मोदी इन्स्टिटयूट फायनान्सीयल ॲन्ड मॅनेजमेंन्ट स्टडीज, प्राचार्य — सर जे.जे. स्थापत्यशास्त्र महाविद्यालय, यांना कळविण्यात येते की, तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील विविध पदवी, पदव्युत्तर पदवी व पदविका अभ्यासक्रमांसाठी अभ्यागत अध्यापकांना प्रदान करावयाच्या मानधनाचे सुधारीत दर लागू करण्याबाबत शासनाने शासन निर्णय क्रमांक संकीर्ण—२०१६/प्र.क्र.(१००/१६)/तांशि—१, दिनांक १७ मार्च, २०१७ अन्वये आदेश निर्गमित केले आहेत. सोबत शासन निर्णयाची प्रत जोडली असून सदरच्या शासन निर्णयाप्रमाणे महाविद्यालय/संस्था स्तरावर कार्यवाही करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्यांचा संकेताक क्रमांक २०१७०३१७११३०४४३३०८ आहे.

मुंबई — ४०० ०३२.
दिनांक :—१० जुलै, २०१७

(डॉ. एम. ए. खान)
कुलसचिव
मुंबई विद्यापीठ

प्रति,

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकीय आणि अशासकीय, अनुदानीत/विनाअनुदानित अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, व्यवस्थापन, स्थापत्यशास्त्र आणि हॉटेल मॅनेजमेंन्ट महाविद्यालयांचे प्राचार्य व महाविद्यालयातर्फे संबंधित संस्थाचे अध्यक्ष/ सचिव तसेच संचालक — जमनालाल बजाज इन्स्टिटयूट मॅनेजमेंन्ट स्टडीज, संचालक — अल्केश दिनेश मोदी इन्स्टिटयूट फायनान्सीयल ॲन्ड मॅनेजमेंन्ट स्टडीज, प्राचार्य — सर जे.जे. स्थापत्यशास्त्र महाविद्यालय, यांचे माहितीसाठी आणि पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत माहीतीस्तव सादर :—

१. मा. डॉ. किरण पाटील, उपसचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई—४०० ०३२.
२. मा. संचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, ४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई — ४०० ०५१.
३. मा. सह—संचालक, तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, महापालिका मार्ग, मुंबई—४०००01.
४. कुलगुरूंचे कार्यकारी सचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई — ४०० ०३२.
५. स्वीय सहायक, कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई — ४०० ०३२.
६. स्वीय सहायक, संचालक (ॲकॅडेमिक प्लॅनिंग) फोर्ट, मुंबई — ४०० ०३२.
७. समन्वयक, विद्यापीठ संगणकीय केंद्र (यु.सी.सी.), विद्यानगरी कॅम्पस, कलिना, सांताक्रुझ, मुंबई — ४०० ०९८.
८. अभिलेखा विभाग (रेकॉर्ड सेक्शन) (१० प्रती).

(डॉ. एम्. ए. खान)
कुलसचिव
मुंबई विद्यापीठ

**तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील विविध पदवी, पदव्युत्तर पदवी व पदविका अभ्यासक्रमांसाठी अभ्यागत अध्यापकांना प्रदान करावयाच्या मानधनाचे सुधारीत दर लागू करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२०१६/प्र.क्र. (१००/१६)/तांशि-१**
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- १७ मार्च, २०१७

संदर्भ :- १) उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक टीईडी-२००८/(१८३/०८)/तांशि-५, दिनांक ५/११/२००८

२) संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे क्र.१०/एनजीसी/अभ्यागत/ २०१६/१०८६, दि. १८/०८/२०१६

प्रस्तावना :-

उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अखत्यारितील तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील अभियांत्रिकी / वास्तुशास्त्र / औषधनिर्माणशास्त्र / हॉटेल मॅनेजमेंट ॲन्ड कॅटरिंग टेक्नोलॉजी / व्यवस्थापन महाविद्यालय / तंत्रनिकेतनांमधील विविध पदवी, पदव्युत्तर पदवी व पदविका अभ्यासक्रमासाठी सैधांतिक प्रात्याक्षिके, टयुटोरिअल, आरेखक इ. कामांकरीता संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयान्वये अभ्यांगत अध्यापकांना मानधनाचे दर लागू करण्यात आले आहेत. या महाविद्यालय / तंत्रनिकेतनांमध्ये विविध क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींना निमंत्रित करुन अध्यापन / मार्गदर्शनाकरीता त्यांच्या वेळोवेळी सेवा प्राप्त कराव्या लागतात. सदर क्षेत्रातील अनुभवी, तज्ञ मान्यवरांना संदर्भाधिन शासन निर्णयातील तरतूदीनुसार अल्प मानधनाच्या आधारे आकर्षित करुन अभ्यासक्रमाचा दर्जा टिकविणे सद्य:स्थितीत जिकरीचे होत असल्याने सध्याच्या मानधनामध्ये वाढ करण्याचा प्रस्ताव संचालनालयाने वरील संदर्भ क्र. ०२ अन्वये शासनास सादर केला होता. त्यास अनुसरुन सर्वांगीन विचार करुन खालीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

शासन निर्णय :-

उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अखत्यारीतील तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील महाविद्यालये / तंत्रनिकेतनांमध्ये विविध पदवी, पदव्युत्तर पदवी व पदविका अभ्यासक्रमासाठी निमंत्रित करण्यात येणा-या अभ्यांगत अध्यापकांसाठी खाली दर्शविल्याप्रमाणे मानधनात या शासन निर्णयाच्या दिनांकापासून सुधारणा करण्यास याद्वारे मंजूरी देत आहे.

| अ. क्र. | अभ्यासक्रमाचा प्रकार | दि. ५.११.२००८ चे शासन निर्णयान्वये अनुज्ञेय असलेले (प्रति तासाकरीता) | सुधारीत दर (प्रति तासाकरीता) |
|---|---|---|---|
| १ | अभियांत्रिकी/ वास्तुशास्त्र/औषधनिर्माणशास्त्र /हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड कॅटरींग टेक्नॉलॉजी, व्यवस्थापन महाविद्यालये /तंत्रनिकेतने या मधील अभ्यासक्रमांसाठी उद्योग / व्यवसाय क्षेत्रातून निमंत्रित केलेले तज्ञ / अनुभव संपन्न ज्येष्ठ व्यवस्थापक / जेष्ठ अभियंता इत्यादीचे मार्गदर्शनपर व्याख्यान | रु.३००.०० | रु. १०००.०० |
| २ | अभियांत्रिकी/ वास्तुशास्त्र/औषधनिर्माणशास्त्र /व्यवस्थापन /हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड कॅटरींग टेक्नॉलॉजी इत्यादी पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी आमंत्रित अभ्यागत अधिव्याख्यात्यांसाठी मानधन -<br>१) सैंध्दातिक<br>२)प्रात्यक्षिके/औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमातील औषधनिर्माण शास्त्र प्रयोगशाळा प्रात्यक्षिके/टयुटोरियल्स /आरेखन /वास्तुशास्त्र मधील आरेखन काम इत्यादी | <br><br><br><br>रु. ३००.००<br><br>रु. १५०.०० | <br><br><br><br>रु. ६००.००<br><br>रु. ३००.०० |
| ३ | अभियांत्रिकी / वास्तुशास्त्र/औषधनिर्माणशास्त्र / हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड कॅटरींग टेक्नॉलॉजी इत्यादी संस्थेतील पदविका अभ्यासक्रमांसाठी आमंत्रित अभ्यागत अधिव्याख्यात्यांसाठी मानधन -<br>१) सैध्दांतिक<br>२) प्रात्यक्षिके / औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमातील औषधनिर्माण शास्त्र प्रयोगशाळा प्रात्यक्षिके /टयुटोरियल्स / आरेखन काम इत्यादी | <br><br><br><br>रु. २५०.००<br><br>रु. १२५.०० | <br><br><br><br>रु. ५००.००<br><br>रु. २५०.०० |
| ४ | अभियांत्रिकी/ वास्तुशास्त्र/औषधनिर्माणशास्त्र /हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड कॅटरींग टेक्नॉलॉजी/ व्यवस्थापन इत्यादी महाविद्यालयातील नियमित आस्थापनेवरील अधिव्याख्यात्यांनी त्यांच्या पदानुसार निश्चित तासिका पेक्षा जास्त तासिका घेतल्यास अधिकच्या तासिकांसाठी अतिरिक्त मानधन -<br>१) सैध्दातिक<br>२) प्रात्यक्षिके /टयुटोरियल्स / आरेखन काम इत्यादी | अनुक्रमांक २ येथील दराच्या ५० % | <br><br><br><br><br><br><br>रु. ३००/-<br>रु. १५०/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | अभियांत्रिकी/ वास्तुशास्त्र/औषधनिर्माणशास्त्र /हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड कॅटरींग टेक्नॉलॉजी इत्यादी तंत्रनिकेतने/संस्था मधील नियमित आस्थापनेवरील अधिव्याख्यात्यांनी त्यांच्या पदानुसार अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मानके/प्रमाणकांनुसार निश्चित तासिका पेक्षा जास्त तासिका घेतल्यास अधिकच्या तासिकांसाठी अतिरिक्त मानधन -<br>१) सैध्दांतिक<br>२) प्रात्यक्षिके /टयुटोरियल्स / आरेखन काम इत्यादी | अनुक्रमांक ३ येथील दराच्या ५० % | <br>रु. २५०/-<br>रु. १२५/- |

२. वरील सुधारित दर पुढील अटींच्या अधीन राहून मंजूर करण्यात येत आहे.

१) अभ्यागत शिक्षक निमंत्रित करण्यापूर्वी संस्थेतील संबंधित विद्याशाखेतील सर्व शिक्षकीय तसेच प्रशासकीय पदावरील काम करीत असलेल्या शिक्षकांना प्रमाणकानुसार शैक्षणिक भार दिला आहे याची खात्री करुन घ्यावी.

२) उद्योग क्षेत्रातील या व्यवसायातील अनुभवी संपन्न व्यक्तींना विशेषत: मंजूर रिक्त पदाचा कार्यभार पूर्ण करण्यास सोयीचे व्हावे या करीता निमंत्रित करण्यात यावे. मात्र या अभ्यागतांची अर्हता ही सेवा प्रवेश नियमातील तरतुदीनुसार किमान शैक्षणिक अर्हता व अनुभव असणे आवश्यक असेल.

३) तासिका तत्वावरील कोणत्याही उमेदवारास एकाच महिन्यात त्यांच्या दर्जाच्या अनुज्ञेय वेतनश्रेणीतील सुरवातीच्या वेतनश्रेणीच्या रकमेपेक्षा जास्त मानधन द्यावे लागू नये. याची जबाबदारी संबंधित महाविद्यालय / तंत्रनिकेतनाचे प्राचार्य यांची असेल.

४) तासिका तत्वावरील निमंत्रित हे सेवानिवृत्त व संबंधित अभ्यासक्रमाशी निगडीत व्यवसायातील तज्ञ व्यक्ती पूरते मर्यादित राहतील.

५) सदर प्रयोजनार्थ येणा-या खर्चास अतिरिक्त निधी मंजूर करण्यात येणार नाही. सबब या करीता येणारा खर्च हा संस्थेकडे उपलब्ध असना-या निधीतून / मंजूर अनुदानातूनच करणे आवश्यक असेल.

६) तसेच कोणत्याही अभ्यांगत निमंत्रित अध्यापक / व्यक्ती संस्थेतील शासनाच्या मंजूर रिक्त पदावर नियमित नियुक्तीकरीता हक्क असणार नाही. या संदर्भात प्राचार्य / संचालक यांनी आवश्यक खबरदारी घेणे आवश्यक असेल.

३. वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक ७४८/व्यय-५, दिनांक ०७/१२/२०१७ अन्वये मिळालेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०३१७१११३०४४३३०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dr.Kiran Patil

Digitally signed by Dr.Kiran Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher and Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=657661007c4f6885bf8deae62f13606632589e592d8c18ceb9a49bfd30471850, cn=Dr.Kiran Patil
Date: 2017.03.17 13:13:23 +05'30'

(डॉ. किरण पाटील)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति :-

१. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
३. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
४. संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
५. संचालक, ग्रंथालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
६. प्राचार्य, ॲकॅडमी आर्किटेक्चर, मुंबई
७. कक्ष अधिकारी, तांशि-१, तांशि-२, मशि-१, मशि-२, मशि-३
८. निवड नस्ती, तांशि-५.